अन्न व नागरी पुरवठा विभाग

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २० नोव्हेंबर, १९९२

मुंबई विक्री कर अधिनियम, १९५९

क्रमांक-सीपीसी-१०८९/६९९/प्र.क्र.४२७/सीएस-दहा :- ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधी नियम करणे आणि त्याकरिता मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ (१९५९ चा मुंबई ५१) याच्या कलम-७३, पोटकलम-(४) द्वारे आवश्यक असलेली नियमांच्या पूर्वप्रसिध्दीची शर्त काढून टाकणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी, आता मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ (१९५९ चा मुंबई ५१) याच्या कलम-७४, पोटकलम-(१) व पोटकलम-(२) चे खंड (बारा-क) व (बारा-ख) आणि पोटकलम-(४) चे परंतुक याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधीतून ग्राहक संघटनांना अनुदान देण्याची पध्दत आणि त्यातून अनुदान देणे व त्यासाठीची ग्राहक संघटनांची अर्हता यांची तरतूद करण्यासाठी पुढील नियम करीत आहे ते असे :-

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :- (१) या नियमांना, महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधी नियम, १९९२ असे म्हणावे.

(२) ते तात्काळ अंमलात येतील.

२. व्याख्या :- या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, --

(१) "अधिनियम" याचा अर्थ,ग्राहक संरक्षण अधिनियम,१९८६ (१९८६ चा ६८) असा आहे;

(२) "निधी" याचा अर्थ,मुंबई विक्रीकर अधिनियम,१९५९ याचे कलम-३८,पोटकलम-(६क) चा (खंड एक) याखाली निर्माण केलेला महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधी, असा आहे ;

(३) "ग्राहक संघटना" याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम,१९६० किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा याखाली नोंदणी करण्यात आलेला कोणताही स्वयंसेवी ग्राहक संघ, असा आहे.

(४) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(५) "प्रकल्प" याचा अर्थ, निधी खर्च करण्यासाठी कोणत्याही ग्राहक संघटनेने सादर केलेली कोणतीही योजना, असा आहे ;

(६) "अनुदान" याचा अर्थ, या नियमांखाली मंजूरी देण्यात आलेली नियत रक्कम, असा आहे.

३. निधीचा निकाय :- पुढील रकमा मिळून (निधी बनेल) किंवा पुढील रकमा निधीमध्ये घालता येतील :-

(१) मुंबई विक्रीकर अधिनियम,१९५९ याचे कलम-३८,पोटकलम-(६क)(एक) याच्या तरतूदींखाली व ज्या अनुसार सरकारजमा करण्यात आलेल्या आणि वसूल करण्यात आलेल्या सर्व रकमा ;

(२) याप्रमाणेच निर्माण करण्यात आलेल्या निधीमधून भारत सरकारने ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन केंद्रासाठी सरकारला दिलेले वित्तीय सहाय्य ;

(३) गुंतवणूकांवरील व्याज किंवा लाभांश ;

(४) विशेषकरुन या प्रयोजनासाठी कोणत्याही स्त्रोतामार्फत - मग तो कोणताही असो - मिळालेल्या अन्य कोणत्याही जमा रकमा ;

४. निधीच्या उपयोजनाचे हेतू :- निधीचा वापर पुढील गोष्टींसाठी करण्यात येईल.

(एक) ग्राहकांच्या आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असलेल्या माल व सेवापासून ग्राहकांचे संरक्षण करणे ;

(दोन) ग्राहकांच्या आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण करणे व ते वाढवणे ;

(तीन) प्रत्येकाला आपल्या इच्छेनुसार व गरजांप्रमाणे वस्तूंची जाणीवपूर्वक निवड करता यावी यासाठी ग्राहकांना समुचित माहिती मिळावी म्हणून जास्तीत जास्त मार्ग उपलब्ध करुन देण्यावर भर देणे ;

(चार) प्रिंट-ऑडियो, दृक-श्राव्य व इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांमार्फत ग्राहकांना माहिती देणे व त्यांच्यात जागृती निर्माण करण्यावर भर देणे ;

(पाच) ग्राहकांच्या तक्रारींचे परिणामकारकरित्या निवारण करणा-या पध्दती शोधून काढण्यावर भर देणे ;

(सहा) ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ यासाठीच्या वैयक्तिक तसेच संघटनात्मक प्रयत्नांना पाठिंबा देणे व त्यास प्रोत्साहन देणे.

५. अनुदानासाठी पात्र संघटना :- (१) पुढील संघटना व संस्था, जर त्या ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन कार्यक्रमांमध्ये स्वेच्छेने गुंतलेल्या असतील तर, या निधीमधून अनुदान मिळण्यास पात्र ठरतील,

(एक) ग्राहक संघटना.

(दोन) नोंदणीकृत महिला मंडळे.

(तीन) नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त संस्था.

(चार) कोणतीही नोंदणीकृत संशोधन संस्था.

(पाच) राज्यातील मान्यताप्राप्त विद्यापीठे.

(२) पोटनियम-(३) मध्ये नमूद केलेल्या व ह्या निधीतून अनुदान मिळावे यासाठी प्रयत्नशील असणा-या कोणत्याही संघटनेला किंवा संस्थेला त्यासाठी पात्र होण्याकरिता पुढील शर्तींची पूर्तता करावी लागेल.

२०५/१

(एक) ती ग्राहकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करीत असावी आणि त्यासाठी हातभार लावत असावी.

(दोन) तिच्याकडे सार्वजनिक निधी सोपविता यावा असा तिचा कायदेशीर दर्जा असावा.

(तीन) ती, राजकीयेतर असांप्रदायिक, शासकीयेतर व खाजगी मालकी नसलेल्या व्यवस्थापनाखालील संस्था / संघटना असावी.

(चार) तिला आयकर व संपत्ती कराच्या प्रदानातून सक्षम प्राधिका-याकडून सूट मिळत असावी.

(पाच) तिच्यासमोर ग्राहकांचे हितसंबंध वाढविण्यासाठी / उचलून धरण्यासाठी व त्यांचे संरक्षण करण्यासाठीची सुस्पष्ट उद्दिष्टे असावी.

(सहा) ती कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या गटाच्या फायद्यासाठी चालविण्यात येणारी नसावी तर ती जात, पंथ, वर्ण किंवा धर्म यांचा कोणताही भेदभाव केल्याशिवाय सर्वसामान्यांसाठी चालविण्यात येणारी असावी.

(सात) शक्यतोवर तिचे एक विशिष्ट कार्यक्षेत्र असावे जेणेकरुन ती राबवित असलेल्या प्रकल्पांची परिणामकारकता जोखता यावी.

(आठ) संबध्द अधिनियमांखाली प्रारंभिक नोंदणी करण्यात आल्यानंतर तिने किमान दोन वर्षे यासाठी काम केलेले असावे आणि ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्याच्या कामात तिने एक महत्वपूर्ण संस्था / संघटना अशी स्वत:ची ओळख निर्माण केलेली असावी.

(नऊ) तिने पुढील लेखापरिक्षित विवरणपत्रे ठेवलेली असावीत :-

(क) जमा रकमा व प्रदाने

(ख) उत्पन्न व खर्च ; आणि

(ग) ताळेबंद

(दहा) तिला या प्रयोजनासाठी केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने निरर्ह ठरविलेले नसावे.

(अकरा) तिने याच प्रयोजनासाठी व याच कालावधीसाठी अंशत: किंवा पूर्णत: अन्य कोणत्याही शासकीय स्त्रोताकडून यासारखेच अनुदान घेतलेले नसावे.

(बारा) व्यापार व उद्योगाचे स्त्रोत वगळता,अन्य मार्गांनी तिने या निधीमधून जितक्या रकमेची मागणी केली असेल तितकी किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम उभारण्याइतकी तिची क्षमता असली पाहिजे.

६. <u>अनुदानाचे प्रयोजन</u> :- (१) संस्था सर्वसाधारणपणे उत्तम स्थितीत चालवण्यासाठी अनुदान मंजूर करण्यात न येता, ते सामान्यत: विशिष्ट प्रकल्प आणि कृती कार्यक्रम राबण्याकरिता मंजूर करण्यात येईल ;

पुढील कार्यक्रम अनुदान मिळण्यास पात्र असतील ते असे :-

(क) ग्राहकांच्या समस्यांवर संशोधन करणे व त्याचा शोध घेणे,

(ख) ग्राहकांचे अर्थशास्त्र याविषयीच्या अनेक तथ्यांवर संशोधन करण्यासाठी तसेच राज्यातील कोणतेही विद्यापीठ किंवा संस्था यांच्याकडून पदविका, पदवी किंवा पदव्युत्तर पदवी

स्तरावर हा विषय शिकविला जाण्यासाठी योग्य तो शैक्षणिक अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी अर्थशास्त्र विभागात ग्राहक अर्थशास्त्र हे युनिट स्थापन करणे.

(ग) ग्राहक कायदा याविषयीच्या अनेक तथ्यांवर संशोधन करण्यासाठी तसेच विधी विभागात आणि राज्यातील कोणतेही विद्यापीठ किंवा संस्था याद्वारे पदविका, पदवी किंवा पदव्युत्तर पदवी या स्तरावर हा विषय शिकविला जावा यासाठी एक योग्य तो अभ्यासक्रम विकसित केला जाण्यासाठी एक युनिट स्थापन करणे.

(घ) चाचणी प्रयोगशाळा स्थापन करुन त्याद्वारे ग्राहकांसाठीच्या अनेक उत्पादनांचा दर्जा व प्रमाण पडताळून पाहण्याकरिता चाचणी कार्यक्रम हाती घेणे.

(ड) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमीसारख्या प्रशिक्षण संस्थांद्वारे, ग्राहक संरक्षण व मार्गदर्शनाचे काम करणा-या कार्यकर्त्यांना याबाबतीतील प्रशिक्षण देणे या खास प्रयोजनासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम, कार्यशाळा, परिसंवाद किंवा त्यासारखे उपक्रम आयोजित करणे.

(च) प्रदर्शने, व्याख्याने, चित्रपट, प्रात्याक्षिके इत्यादींद्वारे शहरी व ग्रामीण अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये ग्राहक शिक्षण व जागृती कार्यक्रम आयोजित करणे.

(छ) खासकरुन लहान लहान शहरे व ग्रामीण क्षेत्रे यामध्ये ग्राहक चळवळीस उत्तेजन देण्याकरिता वापर करण्यासाठी फिल्म प्रोजेक्टर, माहितीपट, सार्वजनिक सभा घेण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री चाचणी संच, ग्रंथालयीन पुस्तके व मासिके ह्यासारख्या साधनसामग्रीची खरेदी करणे.

(ज) शासनास ग्राहक संरक्षणाच्या हेतूने समुचित वाटतील अशा अन्य कोणत्याही योजना व कार्यक्रम वेळोवेळी राबविणे. तथापि, ग्राहक संरक्षणावरील असले तरी संदिग्ध स्वरुपातील प्रकल्प किंवा याबाबतीत केवळ एकदाच करावयाच्या कामासाठी अनुदान मंजूर होणार नाही.

(२) शासनाला, ग्राहक संरक्षण, जागृती व मार्गदर्शन या कामाला उत्तेजन देण्याचे उल्लेखनीय व सातत्याने काम करणा-या संस्था, शासकीय कर्मचारी व ग्राहकांसाठी काम करणारे कार्यकर्ते व इतर व्यक्ती यांना पारितोषिके देण्यासाठी योग्य ती योजना सुरु करता येईल.

७. अनुदानाचे स्वरुप :- निधीतील अनुदान पात्र संस्थांना काटेकोरपणे केवळ पुढील प्राथम्य क्रमानुसार मंजूर करण्यात येईल :-

(१) नियम-६ (१)(क) मध्ये दर्शविलेल्या प्रयोजनांसाठी

(२) नियम-६ (१)(ख) व (ग) मध्ये दर्शविलेल्या प्रयोजनांसाठी

(३) नियम-६ (१)(घ), (ड) व (च) मध्ये दर्शविलेल्या प्रयोजनांसाठी

(४) नियम-६ (१)(छ), (ज) व नियम-६ (२) मध्ये दर्शविलेल्या प्रयोजनांसाठी

परंतु, कोणत्याही वर्षासाठी अनुदानाकरिता उपलब्ध असलेली, निधीतील ५० टक्के इतकी रक्कम, नियम-६ (क)(ख) व (ग) मध्ये दर्शविलेल्या प्रयोजनांसाठी राखून ठेवण्यात येईल. राखून वण्यात आलेली ही रक्कम किंवा त्या रकमेचा कोणताही भाग नियम-६ खालील अन्य योजनांसाठी वळविता येणार नाही. कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही वर्षी, नियम-६ (क)(ख) (ग) मध्ये दर्शविलेल्या प्रयोजनांसाठी हे अनुदान मंजूर करणे शक्य नसल्यास, राखून ठेवण्यात

आलेली ही रक्कम, पुढील वर्षासाठी ठेवण्यात येईल आणि नंतर केवळ विनिर्दिष्ट कारणासाठीच तिचा वापर करण्यात येईल.

८. <u>निधीचे व्यवस्थापन</u> :- निधीचे एकंदर व्यवस्थापन पुढील अधिका-यांचा समावेश असलेल्या व्यवस्थापन समितीकडे निधित असेल :-

| | | |
|---|---|---|
| १ सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन | -- | अध्यक्ष |
| २ वित्तीय सल्लागार व उप सचिव,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन | -- | सदस्य |
| ३ कार्यकारी सचिव, राज्यस्तरीय ग्राहक संरक्षण परिषद,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन | -- | सदस्य सचिव |
| ४ दर दोन वर्षांकरिता आळीपाळीने शासनाकडून नियुक्त करण्यात आलेले स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे दोन प्रतिनिधी | -- | सदस्य |

९. <u>व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये</u> :- (१) व्यवस्थापन समिती, निधीचा वापर कसा होतो यावर देखरेख ठेवील.

(२) तिला, निधी किंवा निधीचा कोणताही भाग स्वतःच्या स्वेच्छाधिकारात शासकीय रोखे किंवा राष्ट्रीयकृत बँक यामध्ये गुंतवण्याचे अधिकार असतील,

(३) पात्र संस्था किंवा संघटना यांच्याकडून अनुदान मिळण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज तिला मागविता येतील.

(४) ती, अनुदान मंजूर व्हावे यासाठी पात्र संघटनांकडून आलेल्या अर्जांची पडताळणी करील.

(५) पात्र संघटनांनी अनुदान मिळण्यासाठी केलेल्या विनंतीचा विचार करताना तिला योग्य वाटतील अशी कागदपत्रे व माहिती त्यांच्याकडून मागविण्याचा तिला अधिकार असेल.

(६) अनुदानाचे नियमन करण्यासाठीच्या शर्ती विहित करण्याचा तसेच पात्र संघटनांकडून सादर करण्यात यावयाचे लेखे सादर करण्याची पध्दती व रीत विहित करण्याचा देखील तिला अधिकार असेल. व्यवस्थापन समितीला, कोणत्याही लाभाधिकारी संस्थेच्या लेख्यांची, देण्यात आलेले अनुदान योग्यरीत्या खर्च करण्यात येत आहे किंवा ते ज्या प्रयोजनांसाठी देण्यात आले होते त्याच प्रयोजनांसाठी ते खर्च करण्यात येत आहे किंवा नाही याबाबतीत स्वतःची खातरजमा करुन घेण्यासाठी तिच्या स्वेच्छाधिकारात तपासणी करता येईल किंवा तपासणी करुन घेता येईल.

(७) नियम-६ व ७ मध्ये घालून दिलेल्या शर्तींच्या अधीनतेने, तिला योग्य वाटेल अशा पध्दतीने व त्या मर्यादेपर्यन्त पात्र संघटनेला अनुदान मंजूर करण्याचा तिला अधिकार असेल.

(८) अनुदानग्राही संघटनेला अनुदान परत करण्यास सांगण्याची किंवा भविष्यात आणखी अनुदान मिळविण्यासाठी, विहित करण्यात आलेल्या कोणत्याही शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर करणा-या एखाद्या संस्थेस भविष्यकाळात आणखी अनुदान मिळण्याकरिता ती अपात्र असल्याचे जाहिर जीर करण्याचा तिला अधिकार असेल.

(९) पोटनियम-(४),(५),(६),(७) व (८) च्या बाबतीत व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम असेल आणि त्याचे पुनर्विलोकन कोणत्याही न्यायालयाचा किंवा कोणत्याही ग्राहक मंचाला करता येणार नाही.

(१०) व्यवस्थापन समिती, तिच्या बैठकीची कार्यपध्दती, रीत व नियतन कालांतर निश्चित करील. मात्र, दोन बैठकींमधील कालांतर तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(११) निधीच्या उचित कार्यान्वयनाचे व तो योग्यरीत्या ठेवण्यासाठी आवश्यक असतील अशी पावले उचलण्याचे संपूर्ण अधिकार समितीला असतील.

(१२) समिती, शासनाद्वारे विहित करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, अशा शर्तींच्या अधीनतेने, ग्राहक संरक्षणाचे कार्य उल्लेखनीयरीत्या करणा-या लायक संस्था, ग्राहक संरक्षणाची कामे करणारे कार्यकर्ते, अन्य व्यक्ती व शासकीय कर्मचारी क्रमोरी यांचा गौरव करण्यासाठीच्या योजना तयार करील.

(१३) व्यवस्थापन समिती तिने हाती घेतलेल्या कार्यक्रमांचा अहवाल व लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील आणि प्रत्येक वित्तीय वर्षी, राज्य ग्राहक संरक्षण परिषदेच्या पहिल्या बैठकीत तो सादर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

( एन. बी. धानोरकर )

शासनाचे अवर सचिव

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.